राज्यातील लोककलावंतांना अनुदान पॅकेज- भजनी मंडळांना भांडवली अनुदान मंजूर करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

शासन निर्णय क्रमांक: लोकपॅ-४७२५/प्र.क्र.४१०(ई.नं. १२६३७०६ )/सां.का.४

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: ११ ऑगस्ट, २०२५.

वाचा: १) शासन निर्णय क्र. लोकअ-२००७/प्र.क्र.१२७/सां.का.३, दि.०१.०१.२००८.

२) संचालक, सांस्कृतिक कार्य, मुंबई यांचे पत्र क्र. सांकासं/३७१८, दि. ०६ ऑगस्ट, २०२५.

**प्रस्तावना :-**

राज्यातील सांस्कृतिक व पारंपारिक कलेची लोकांना माहिती व्हावी तसेच त्याचे जतन व संवर्धन करण्यासाठी सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देण्याचे कार्य सांस्कृतिक विभागातर्फे करण्यात येते. यासाठी राज्यात नाटय/संगीत नाटय महोत्सव, चित्रपट महोत्सव, तमाशा महोत्सव इत्यादी महोत्सव आयोजित केले जातात. चित्रपट निर्मात्यांना मराठी चित्रपट निर्मितीसाठी अनुदान दिले जाते, सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणा-या संस्थांना अनुदान दिले जाते. नविन नाटकाचे प्रयोग करण्यासाठी नाट्य संस्थानांही अनुदान दिले जाते. त्याच धर्तीवर राज्याच्या कानाकोपऱ्यात विशेषतः ग्रामीण भागात लावणी, तमाशा, दशावतार, खडीगमंत इत्यादी सारख्या लोककला प्रकार सादर करणाऱ्या संस्थांनी अनुदान देण्याची विनंती शासनास केली होती. पूर्णवेळ तमाशा करणारा फड, हंगामी तमाशा करणारा फड, दशावतार मंडळे, खडीगंमत कलापथके, लावणी कलापथके आणि शाहीरी पथके यांना अनुदान देण्याचा शासन निर्णय संदर्भ क्र. १ अन्वये निर्गमित झालेला होता.

महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात राज्याच्या विविध भागांमध्ये साजरा केला जातो. भक्ती व अध्यात्माला सामाजिक बाबींची जोड देणारा हा महोत्सव महाराष्ट्राच्या केवळ आर्थिक-सामाजिक व सांस्कृतिकच नाही तर भावनिक बंधाशी जोडला गेलेला आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाचे हेच महत्त्व ओळखून, विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मंत्री, सांस्कृतिक कार्य यांनी सार्वजनिक गणेशोत्सव हा "राज्य महोत्सव" म्हणून साजरा करण्याबाबत घोषणा केली होती. त्या अनुषंगाने संपूर्ण राज्यभर, राज्याच्या बाहेर व देशाच्या बाहेरही विविध सांस्कृतिक कार्यक्रम/उपक्रम साजरे करण्याबाबत सूचना प्राप्त झालेल्या होत्या. विविध स्पर्धा/सांस्कृतिक कार्यक्रम/पर्यटन/सांस्कृतिक देवाणघेवाण तसेच परंपरा व आधुनिकतेची सांगड घालून हा राज्य महोत्सव अधिकाधिक लोकाभिमुख व्हावा. त्याचाच एक भाग म्हणून भजनी मंडळांना भांडवली अनुदान देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

महाराष्ट्राच्या सर्व लोककला टिकून रहाव्यात या लोककलाची पुढील पिढीला माहिती व्हावी आणि महाराष्ट्रातील एकूणच सर्व पारंपरिक लोककलांचे जतन करण्यासाठी या लोककलांना उत्तेजन देण्याच्या हेतूने कलापथकांना आर्थिक मदत संदर्भाधीन दिनांक ०१ जानेवारी, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली आहे. आता त्यामध्ये भजनी मंडळ पथकांना भांडवली अनुदान देणे याबाबतची वाढ करुन प्रथम टप्प्यात १८०० भजनी मंडळास प्रत्येकी रु.२५,००० याप्रमाणे एकूण रु.४,५०,००,०००/- एवढ्या रकमेस सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूदीमधून भागविण्यास प्रशासकीय मान्यता दर्शविण्यात येत आहे. या भांडवली अनुदानातून भजनी मंडळांनी त्यांना आवश्यक असणाऱ्या संगीत वाद्यांची उदा. हार्मोनियम/मृदंग/पखवाज/वीणा/तंबोरा/एकतारी/टाळ व इतर अनुषंगिक साहित्य खरेदी करणे आवश्यक राहील.

०२. **भजनी मंडळाच्या पथकांचे पात्रतेचे निकष:-**

१. एका वर्षात किमान ५० कार्यक्रम सादर करणारी व पूर्ण वेळ व्यवसाय करणारी भजनी मंडळे असावीत.

२. अनुदानाच्या रकमेनुसार कलापथकांच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील. भजनी मंडळामध्ये किमान २० सदस्य असावेत.

३. भजनांच्या कार्यक्रमांचे पुरावे उदा. आयोजकाचे पत्र, प्रमाणपत्र हँडवील, ग्रामपंचायत दाखला किंवा कार्यक्रम सादरीकरणाचा इतर सक्षम पुरावे ग्राह्य धरण्यात येतील.

४. एकदा अनुदान मिळाल्यानंतर सदरील संस्था किमान ३ वर्षानंतर पुन्हा अनुदानाकरीता अर्ज करु शकते.

५. भांडवली खर्चासाठी अनुदान प्रत्येक कलापथकाला जास्तीत जास्त २ वेळा देय राहील.

६. अर्ज करण्याची पध्दत व निवड प्रक्रिया-भजनी मंडळांना भांडवली अनुदान देण्याबाबत mahaanudan.org या ऑनलाईन पोर्टलवर प्रथम अर्ज दाखल करण्याऱ्या पथकास प्रथम प्राधान्य या तत्त्वानुसार असेल. निकषांची पुर्तता करणाऱ्या व ऑनलाईन पोर्टलवर प्रथम अर्ज करणाऱ्या १८०० भजनी मंडळांची निवड करण्यात येईल.

७. सदर भांडवली अनुदानासाठी पथकांनी ऑनलाईन अर्ज भरता येतील. अर्ज भरण्यासाठी १५ दिवसाचा कालावधी अनुज्ञेय असेल. भांडवली खर्चासाठी अनुदान योजनेसंदर्भात अंतिम निर्णय शासनाचा राहील. सदर योजनेचा तीन वर्षानंतर आढावा घेण्यात येईल.

८. संदर्भाधीन दिनांक ०१.०१.२००८ रोजी गठीत केलेल्या समितीमध्ये भजनी मडळ पथकांना भांडवली अनुदान या बाबीचा समावेश नव्याने केलेला असल्याने भजन क्षेत्रातील २ तज्ञांचा समावेश पूर्वीच्या समितीमध्ये करण्यात येईल.

९. कलापथकांना दि.०१.०१.२००८रोजीच्या शासन निर्णयानुसार पूर्वीच्याच अटी, शर्ती व निकषानुसार भांडवली अनुदान देय राहील.

०३. या योजनेचा खर्च "मागणी क्र. झेडडी-२, लेखाशीर्ष-२२०५ कला व संस्कृति, १०२ कला व संस्कृति यांचे प्रचालन, (०२) (०१) कला व सांस्कृतिक संस्थांना सहायक अनुदान (२२०५ १५३४), ३१-सहायक अनुदान(योजनातर्गत योजना)" या लेखाशीर्षातून त्या त्या वर्षी मंजूर करण्यात येणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

०४. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय याना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०५. सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनिमय, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

०६. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७ एप्रिल, २०२५ मधील सर्व परिच्छेद परीशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( बाळासाहेब ईश्वर सावंत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (सां.का.४) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, पहिला मजला, एम. जी. रोड, मुंबई.
५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. निवड नस्ती, सां.का.४